**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
**PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in,
विद्यार्थी विकास विभाग

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**Prof. Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**


संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/1082 दि. 16/09/2022

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था, व
मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,
सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– सन 2022–2023 जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाबाबत...**
**संदर्भ:– 1) या विभागाचे संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/1068 दि. 02/09/2022 रोजीचे पत्र.**
**2) या विभागाचे संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/1069 दि. 08/09/2022 रोजीचे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषय पत्रान्वये, शिवाजी विद्यापीठाचा 42 वा जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव 2022–2023 च्या अनुषंगाने खालील बाबींची नोंद घेवून आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांचा संघ बनवून युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावे.

**सुचना:–**

1. संदर्भ क्रं. 1 च्या पत्रानुसार, जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठीच्या प्रवेशिका दि. 20/09/2022 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत Online पाठविणेबाबत कळविले होते. तथापि, सदरच्या प्रवेशिका **Online भरणेबाबतची मुदत दि. 28/09/2022 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत वाढविणेत आलेली आहे.**
2. भारतीय विश्व विद्यालय संघ, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त दि. 07/09/2022 रोजीच्या पत्रानुसार, कोव्हीड–19 च्या आपतकालीन परिस्थितीमुळे शैक्षणिक वर्ष 2022–2023 या शैक्षणिक वर्षाकरिता दि. 1 जुलै, 2022 रोजी ज्या विद्यार्थ्यांचे वय 27 वर्षाहून कमी असेल अशा विद्यार्थ्यांना युवा महोत्सवामध्ये सहभाग घेता येईल. **सदरचा बदल हा शैक्षणिक वर्ष 2022–2023 या वर्षाकरिता लागू राहील.**
3. उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं. 1 नुसार, युवा महोत्सव माहिती पुस्तिकेतील लोकनृत्य व लोककला या दोन्ही कलाप्रकारामध्ये दिंडी नृत्याचा उल्लेख करणेत आलेला आहे. **तथापि, दिंडी नृत्य हे लोकनृत्य असल्याने, लोककला कलाप्रकारात दिंडी नृत्याचा समावेश करू नये.**
4. **जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव प्रवेशिका भरणेबाबतची ऑनलाईन लिंक आपणांस लवकरात–लवकर कळविणेत येईल.**

तरी कृपया वरील बाबींची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास